Exh.7

रे.क.नं. ९६४/२०२५

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल
# यांचे न्यायालयात .......

**१) राजश्री मंगेश रेवडे वगैरे** ..... वादी

विरूद्ध

**१)भैरू तुका निकम वगैरे** ....... प्रतिवादी

जैसे–थे परिस्थिती ठेवणेबाबत अर्ज

यातील वादीतर्फे मे. कोर्टांना विनंती की,

१) प्रस्तूतचा दावा वादींनी दावा मिळकतीच्या हद्‌दी पक्क्या होवून मिळणेकरीता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत कामी प्रतिवादी यांना नोटीस व समन्स लागू होवून तसा रिपोर्ट या कामी आला आहे. तथापि, सदर कामी प्रतिवादी यांचा कैफियत व म्हणणे दाखल करणेकरीता मुदतीचा अर्ज रेकॉर्डवर आहे.

Order
Def.to file Say
C.J.J.D.Kagal

२) अशा परिस्थितीत प्रस्तूत प्रतिवादी हे एकत्र येवून वादींना दावा मिळकतीमधून हाकलून लावणेचा प्रयत्न करीत आहेत. तर काही प्रतिवादी खरेदीची मिळकत सोडून बांधकाम करून दावा मिळकतीचे स्वरूप बदलू पाहत आहेत. तसे झालेस वादींचा नि. ५ वरील मनाईचा अर्ज निष्फळ ठरणार आहे. त्या कारणाने दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे–थे' ठेवणे सोयीचे व न्यायाचे होणार आहे.

३) दावा मिळकतीबाबत प्रतिवादींविरूद्ध 'जैसे–थे' परिस्थिती ठेवणेबाबत आदेश झालेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट तसा आदेश न झालेस वादींचे दावा मिळकतीमधील हक्क संपुष्टात येण्याची भिती आहे.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करून दावा मिळकतीची परिस्थिती 'जैसे–थे' ठेवणेबाबत योग्य तो आदेश व्हावा ही विनंती.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल

दि. २७/११/२०२५

## प्रतिज्ञा

मी यातील वादी नं. २ शुभम मंगेश रेवडे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जामधील संपूर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि. २७/११/२०२५

## ॲफिडेव्हिट

मी यातील वादी नं. २ शुभम मंगेश रेवडे, व.व. २४, धंदा – शेती, रा. व्हन्नूर, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट. आज मु।। कागल

दि. २७/११/२०२५

मी ॲफिडेव्हिट करणार यांना ओळखतो.

ॲड. Adv. N.H. Shelake

## प्रतिज्ञा

मी यातील वादी नं.२ शुभम मंगेश रेवडे अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःच्या माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि. २७/११/२०२५

Solemnly Affirmed before me by
Shri Shubham Mangesh Revde
Age 24 of Vahnnur Kagal who is
identified by Shri N.H. Shelake Adv
.............whom I know personally
Dated :- 27/11/25

Assistant Superintendent

Exh.6

रे.क.नं. ९६४/२०२५

मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल यांचे न्यायालयात-

(1) राजश्री मंगेश रेवडे वै. — वादी

वि.

(1) भैरू निकम — प्रतिवादी

वैगेरे

यातील वादीतर्फे पुरसिस की.

प्रस्तुत कामी प्रतिवादी नं.१ पत्ता शामराव बोराटे हे सैन्यदलात असलेने त्यांच्याविरुद्धची नि.५ वरील मनाई अर्जातील मागणी आजरोजी सद्यपरिस्थितीत काढून घेत आहे. म्हणून दिली पुरसिस.

कागल
ता. २७/११/२०२५

मो.मा.वकील

Order
Seen
C.J.J.D.Kagal

MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2025.12.22 16:38:16 +0530